शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१
**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

जा.क्र.शिउसं/उमाशि-२/नाहरकत/पुवि/२०१६/ ६०/६३
दिनांक :- 2 JAN 2016

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविदयालये,
अहमदनगर/पुणे/सोलापूर

विषय :- खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांचे पदभरतीला नाहरकत/जाहिरात/शिक्षक मान्यता मिळणेबाबत

संदर्भ :-१. शासन निर्णय क्र नियुक्ती-२०१४ (प. क्र.१०३/१४)/टिएनटी-३ दि.११.०६.२०१४.
२. मा.शिक्षण संचालनालयाकडील क्र उच्च माध्य-२४२/शि.से./१७१३८/२०१३- १४ /६६१६ दि. २४.०७.२०१४.
३. शासन निर्णय क्र एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२ दि.२० जुन २०१४.
४. शासन निर्णय क्र एसएसएन-१४/(१/१४)/टिएनटी-२ दि.१९ जुलै २०१४.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, पुणे विभागातील विविध उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयीन दि. ०२ मे २०१२ नंतर रिक्त झालेल्या पदांना नाहरकत प्रमाणपत्र/जाहिरात/शिक्षक मान्यता मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. तसेच ज्या संस्था / कनिष्ठ महाविदयालयांनी अद्याप नाहरकत/जाहिरात/शिक्षक मान्यता बाबत प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेली नाही अशा कनिष्ठ महाविदयालयांनी प्रस्ताव या कार्यालयाकडे दि. ०६.०१.२०१६ अखेर या कार्यालयात दाखल करावेत.

तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी यापुर्वी शिबीरात प्रस्ताव दाखल केलेले त्यांनी प्रस्ताव आपल्या महाविद्यालयातील लिपीक पाठवुन या कार्यालयाच्या यादीत नांव असल्याची खात्री करावी. त्यांनतरच सदरचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार मा.विभागीय आयुक्त पुणे यांना सादर करण्यात येतील.

शासन निर्णय दि. १९.०७.२०१४ नुसार मा.विभागीय आयुक्त पुणे यांची मान्यता असल्याखेरीज नाहरकत प्रमाणपत्र/जाहिरात/शिक्षक मान्यता देता येणार नसल्यामुळे दि. ०६.०१.२०१६ नंतर आलेल्या प्रस्तांवाचा विचार केला जाणार नाही व त्याची सर्व जबाबदारी संबधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
३. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१